# राजर्षी शाहू महाराजांची : कला संस्कृती आणि विवेकी नवसमाज निर्मिती

**प्रा.जी.आर.पाटील.** प्रमुख, मराठी विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर patilgrnewcollege@gmail.com

---

**संशोधनाची उद्‌दिष्टये –**

१.राजर्षी शाहूराजांच्या प्रागतिक विचारांची प्रस्तुता पाहणे.
२.राजर्षी शाहू महाराजांची विवेकी नवसमाज निर्मितीची संकल्पना तपासणे.
३.राजर्षी शाहू राजांच्या उद्यमशील कार्य संचितांवर नव्याने प्रकाश टाकणे.
४.कोल्हापुरी कलानगरीच्या उदयाच्या समाज सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेणे.
५.राजर्षी शाहू राजांची समाज विकासी परिभाषा अभ्यासणे.
६.आधुनिक, पुरोगामी तसेच नवमतवादी विचारांचा सामाजिक परिणाम तपासणे.

**प्रस्तावना –**

अखिल भारतीय स्तरांवर युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराजांचे प्रागतिक कार्य, त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि त्यांनी बजावलेल्या कृतीशील, आधुनिक विज्ञाननिष्ठ पुरोगामी नवमतवादी भूमिका ही पुरोगामी महाराष्ट्राच्याच नव्हेतर देशाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक क्रांतिकारी घटना आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात कोल्हापूर सारख्या एका छोटयाशा संस्थानामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या प्रागतिक कार्याने समाजजीवनात नवपुरोगामीपणाने घडवून आणलेली ही भारतातील एक अपूर्व क्रांती होती. जी आधुनिक भारताच्या ऐतिहासिक प्रबोधन पर्वाच्या परिवर्तनाची नांदी ठरली आहे. काल आज आणि उद्या आपल्या बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक देशाला ती आदर्शवत आहे. अस्सलिखीत पुरोगामी महाराष्ट्र अशा लौकिकास कारण ठरली आहे. २० व्या शतकामध्ये कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, विज्ञान, कृषी, व्यवसाय, उद्योग, व्यापार, पर्यावरण, सहकार विषयक लोकराजा राजर्षी शाहू राजांचे देदीप्यमान कार्य राष्ट्रीय पातळीवर विशेष उल्लेखनीय आहे. संसदीय कार्यप्रणालीमध्ये सतेज अनुकरणीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या आदर्शाने राजर्षी शाहू महाराजांनी मांडलेली सुराज्य तसेच जनकल्याणकारी विवेकी नवसमाज निर्माण संकल्पना भारतीय पातळीवर साकारली. त्यामुळेच ''नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरूष'' असा राजर्षी शाहू महाराजांचा यथोचित कार्यगौरव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला आहे. त्याची आदर्शवत प्रस्तुतता समजाऊन घेणे नेहमीच संशोधन आणि अभ्यासाठी औत्सुक्याची ठरली आहे.

स्वातंत्र्योत्तर पाऊन शतकाच्या भारताच्या लोकशाही वाटचालीत एका राजेशाही कारकिर्दीची आज प्रस्तुतता तरी काय आहे ? असा प्रश्न निर्माण केला जाऊ शकतो. आता कुठे घडणार आहे ! वेदोक्त संग्राम, अस्पृश्यता, विषमता, मागासलेपणा ही टप्प्याटप्प्याने संपत चालली आहे. भेदाभेद तर घूसर होत चालला आहे. आंतरजातीय आंतरधर्मिय विवाहाला प्रोत्सहान दिले जात आहे. तसेच बहुजनांना आता शिक्षण क्षेत्र खुले आहे. भारतीय कायदे मंडळामध्ये स्त्रियांच्या संरक्षणाचे व हिताचे कायदे केले गेले आहेत. स्त्री पुरूष समानता मानली जाते. आता मागासलेपण राहिले नाही. राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहाशी उपेक्षित वंचित पिडीत सर्वजण जोडले गेले आहेत. अशा वेगवेगळ्या बाजू सांगून शाहू विचारधारा अप्रस्तुत ठरवली जाण्याची किंबहूना तिचे सामान्यीकरण करण्याची शक्यता मोठी आहे. पण या सर्व प्रबोधन परिवर्तनाला आधुनिक समाजधारणेच्या मूळाशी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधन पर्वाच्या मूळाशी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सुराज्याची क्रांतीकारी विचार व कार्यांचा भक्कम पाया आहे. स्वातंत्र, समानता, बंधुभाव आणि प्रेम, मानवता या मुल्यांचा पुरस्कार करणारी प्रागतिक विचारधारा आहे. लोककल्याणकारी प्रजाहितैषी 'बहूजन हिताय, बहूजन सुखाय' ही तत्वप्रणाली आहे. आधुनिक भारतीय समाजाच्या घडणीत शिव शाहू विचारांची प्रस्तुतता वर्तमान भूत भविष्यातही अनिवार्यता स्पष्ट आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सृजनशील सौंदर्यवादी नवनिर्माण कार्यप्रणालीने तसेच पुरोगामी विचारधारेने सामाजिक बांधिकली आणि ऐक्याचे सुराज्य उभा करण्याचा संकल्प केला. सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान म्हणजे भारत आहे. येथे बंधुभाव नित्य असू देत. शिक्षणाने आत्मभान यावे, स्वातंत्र्य, समतेच्या समान नागरी कायद्याचे स्वराज्य व्हावे. प्रत्येकाच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण व्हावे. त्यांच्यातील कलागुण बहरावेत. त्यांना कलावंत, रसिक व्यक्तिमत्वाने प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. श्रमशिल जगण्याला निश्चित अर्थ प्राप्त व्हावा. सदैव सुख शांतता नांदावे. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपले आयुष्य समर्पित केले. सौहाद्र, द्रृढमूलता, सहिष्णूता, सहानुभाव, सेवाव्रत, इमानदारी, विश्वास, प्रामाणिकपणा, समानता, बंधुभाव, समाजप्रियता, मानवता या वैश्विक मूल्यांची रूजवात केली. तसेच आपल्या प्रागतिक नवमतवादी विचार कार्याने भारतीय स्तरांवर कलानगरी, मल्लनगरी, चित्रनगरी, वसतिगृहांची नगरी, आरक्षण नगरी, प्रबोधन पुरोगामी नगरी, शिक्षणाची ज्ञानगंगा, राष्ट्रीय चळवळींचे केंद्र अशा सार्थ उपाधीने सजलेल्या

समतेच्या शाहुनगरीला लोककल्याणकारी कार्याने विवेकनगरी असा राष्ट्रीय लौकिक प्राप्त करून दिला. पुरोगामी विज्ञाननिष्ठ कार्यकर्तृत्वाने समाजातील गरीबी, अज्ञान आणि जातीयता, मागासलेपणाचे उच्चाटन करण्याचा घाट बांधला.

दूरदृष्टीच्या राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानी समाज जीवनमान उन्नत करण्यासाठी समाजहितैषीच्या आड येणाऱ्या परंपरावादी कर्मठ जातीयता, रूढी, प्रथा, अंधश्रध्दा नाकारल्या. आधुनिक विशेषत: पुरोगामी विचाराने आणि कार्याने मुलभूत सोयी सुविधा उभारण्यास प्राधान्यक्रम दिले. कलाकौशल्यांवर आधारित येथील व्यापार उद्योगाला गती मिळावी आणि अर्थाजन व्हावे या व्यापक उद्देशाने राजर्षी शाहू छत्रपती यांनी पहिले लोककल्याणकारी कार्य हाती घेतले आणि अल्पावधितच कोल्हापूर मिरज रेल्वे मार्गाचे बांधकाम पूर्ण केले. कोल्हापूर देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहाला जोडले. येथील कला, क्रीडा, साहित्य, व्यापार, उद्योगाला विकासाची आधुनिक दृष्टी प्राप्त करून दिली. उर्वरित महाराष्ट्र आणि देशांशी कोल्हापूरचा संबंध जोडला. दळणवळणामुळे येथील देशी व्यापाराला चालना मिळाली. कोल्हापूरचे मागासलेपण दूर होऊन विकासाची पहाट झाली.

तद्वत कर्तव्याला जागणे तसेच बांधील राहणे.अस्सिम निष्ठा आणि त्यागाचे उदात्त विवेकी दर्शन घडविले की जगणे कसे सुखकर होते. याचा आदर्श राजर्षी शाहू महाराजांनी नोकरशाही आणि राज्यकर्त्यांना घालून दिला आहे. कोल्हापूर संस्थनामध्ये खेडोपाडी कुलकर्णीपासून मामलेदारापर्यंतचे सर्व सरकारी नोकर वर्गाची मुजोरी वाढली होती. नोकरशाही मनमानीपणे सामान्य गोरगरीब जनतेची लुटमार करून स्वत:ची तुंबडी भरून घेत होती. रयतेची राजरोस लुटमार केली जात होती. जंगल व महसूल खात्याकडून जो माल रयतेकडून खरेदी केला जात होता त्याची रितसर पावती कुणबी, वाणी यांच्या प्रमाणे रयतेला सक्तीने त्याच्या पावत्या घ्याव्यात असे स्पष्ट आदेश दिले. राजर्षी शाहू महाराजांनी माजलेल्या नोकरशाहीला एका दमातच सरळ करून कष्टकरी रयतेची लूट थांबविली आणि पिळवणुकीतुन ग्राम जनतेला मुक्त केले. कोणीही अधिकारवाणीने जनतेची लुट करता कामा नये. नोकरांनी जनसेवा ही निष्ठा आणि प्रामाणिकपणे पार पाडावी तसेच आपण जनतेचे सेवक आहोत. चालक व्हावे पण मालक होवू नयेत. जनसेवा हे एक कर्तव्य आहे. त्याकडे एक व्रत म्हणून पहावे. निष्ठेने ते पवित्र कार्य पार पाडावे असा सुशासनाचा मंत्र नोकरशाहीमध्ये रूजविला आणि शाहू महाराजांनी आपल्या संस्थानी राज्यामध्ये भ्रष्टचारमुक्त सामाजिक शिष्टाचाराची पध्दती रूढ केली. विवेकी शुध्दाचरणाचे धडे दिले.

जीवन जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. तसेच ते नाकारण्याचाही अधिकार मात्र कोणाला नाही. जगणे हा प्रत्येकाचा नैसर्गिक अधिकार आहे. एक आशावादी निराशावादावर नेहमी मात करतो. जगण्याची कशी उमेंद वाढवितो हे उदार दयाळू मनाच्या शाहू महाराजांनी आपल्या कर्तत्व तत्परतेने दाखऊन दिले. प्रत्यक्ष आपले भंगलेले झिंगलेले शरीर पाहून भक्तगण दानधर्म करतील. त्या आशेवर पोटाची भूक भागविण्यासाठी अनेक महारोग्यांच्या झुंडी नृसिंहवाडीला जात होत्या. या कृष्ठरोग्यांचे छिन्नविछीन्न शरीर आणि जगणे पाहून दयाळू मनाचे शाहू महाराज गहिवरले, त्यांच्या जगण्याची किव आली. त्यांच्या चितांतुर मनाने वर्षभरातच १८९७ मध्ये 'महाराणी व्हिक्टोरिया लेपर असायलम' उभारले. त्याद्वारे शाहूराजांनी योग्य देखभाल आणि औषधोपचार सुरू करून अहवेलना आणि हेटाळणीचे तसेच यातायात आणि वाताहतीचे महारोग्यांचे नरकमय जीवन फुलविले. त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण केला. मानवतावादी दृष्टिकोनातून उपेक्षित वंचित महारोग्यांसाठी स्वतंत्र वसाहतीची स्थापना करून त्यांना माणुसकीचे जगणे बहाल करणारे कणवाळू दु:खीतांचे अश्रु पुसणारे राजर्षी शाहू महाराज हे संपूर्ण भारतातील पहिला लोकराजा होते. विवेकनिष्ठ मानवता जागविणारे राजे आहेत.

कागलेचे यशवंत ते लोकराजा राजर्षी शाहू महाराज या समाजजीवन प्रवासामध्ये त्यांच्या समाजक्रांतीदर्शी कार्यातुन तसेच प्रागतिक विचारामध्ये आपणास विज्ञाननिष्ठ नवमतवादी विवेकी नवसमाज निर्मितीची बीजे सापडतात. शाहू महाराजांच्या जडणघडणीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर वडील श्रीमान आबासाहेब घाटगे, शिक्षक स्टुअर्ट मिट्फोर्ट फ्रेजर आणि यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांची प्रेरणा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श सौंदर्यवादी तत्त्व शाहू महाराजांना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीस उपयुक्त ठरले आहे. जुनाट कर्मठ सनातनी परंपरा बाजुला सारून पुरोगामी विज्ञाननिष्ठ आधुनिकता स्वीकारली.प्रागतिक विवेकीदृष्टी, चिकित्सक चौफेरवृत्ती तसेच देशी विदेशी शैक्षणिक अभ्यास सहलींनी शाहू महाराजांना डोळस बनविले. इतिहास, भूगोल विषयांच्या अभ्यासाने त्यांना सखोल दूरदृष्टी प्राप्त झाली. भारत भ्रमंतीने शाहू महाराजांना समाजात जातीधर्माचे माजलेले अवडंबर आणि धार्मिक क्षेत्राचे बटबटीत रूप त्यांनी पाहिले. समाज मानसशास्त्र त्यांनी अवगत केले. त्यांतुन मागास उपेक्षित वंचित तसेच अस्पृश्य व पददलितांचे दैन्य, दु:ख, वैफल्य, कारूण्य पुसून समताधिष्ठित विवेकी नवसमाज निर्मितीचा शाहू महाराजांनी संकल्पना राबविली. भारताच्या इतिहासामध्ये एका छोटयाशा कोल्हापूर संस्थानामध्ये घडवुन आणलेली ही अपूर्व ऐतिहासिक, सामाजिक क्रांती होती.शाहू महाराजांनी आपल्या विज्ञाननिष्ठ विवेकाने देशात एक आयडियल मॉडेल निर्माण करून आदर्श निर्माण केला आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्ती ही बंधमुक्त आहे. एखादी गोष्ट एका समाजाची किंवा व्यक्तीचीच कधीच असू शकत नाही. समाजामध्ये सर्वजण सारखेच आहेत. प्रत्येकाचा समान हक्क अधिकार आहे. तसेच प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. शाहू महाराजांनी स्वातंत्र्य आणि समानता आणि बंधुभावी तत्त्वांचा पुरस्कार केला. आज वेदांचा अधिकार कुणी मागण्याच्या भानगडीत पडत नाही. आज वेद अभ्यासाला खुले आहेत. परंतु त्यासाठी राजर्षी शाहूराजांनी सव्वाशेहे वर्षापूर्वी सर्वांच्या धार्मिक हक्कासाठी वेदोक्ताचा संग्राम उभा केला. त्यामध्ये पुरोगामी सामाजिक क्रांतीची बीजे होती. वेदांभ्यासाचा अधिकार फक्त ब्राह्मणांचाच आहे.ही त्यांची मक्तेदारी शाहू महाराजांनी मोडीत काढली. वेदांचा अभ्यास सर्वांसाठी खुला केला. भारतात हिंदू म्हणून जन्मलेल्या प्रत्येकाला वेदांचा व त्यांच्या अनुसार धार्मिक रीतिरिवाज करण्याचा समान अधिकार आहे. मग तो हिंदू ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र पैकी कोणीही असो प्रत्येकाला वेदांचा अभ्यास आणि धार्मिक आचरण करण्याचा नैतिक अधिकार आहे. वेदांची मक्तेदारी चातुवर्ण व्यवस्थेच्या दुष्प्रचारास कारण होती. त्याद्वारे शेकडोवर्षांपासून ब्राह्मण वर्गाने वेदांवरील अग्रमानत्वाच्या अधिकाराने समाज व्यवहारात निर्माण केलेली आणि कठोरपणे जपलेल्या विषमतेच्या विखारी विषांमुळे प्रखर दूरदृष्टीच्या शाहू महाराजांनी समाजातील जातीयता, भेदाभेद, असमानता, नष्ट करण्यासाठी पहिले पाऊल उचलले.ब्राह्मण वर्गाच्या प्रखर विरोधाला न जुमानता वेदांच्या समान हक्कांची चळवळ उभा केली आणि वेदांचा सर्वांना अधिकार बहाल केला. शाहू महाराजांनी सामाजिक क्रांती घडवून मानवतेच्या इतिहासाचा नवा अध्याय निर्माण झाला आहे.

खरे तर वेदोक्त संग्राम हे निमित्त होते. धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मण वर्गाच्या मक्तेदारीला आणि त्यांच्या जातीय विष पेरणीला आव्हान देण्याचे शाहू महाराजांचे धुरीणत्व आजच्या पिढीला पेलले असते का ? त्यासाठीचा संघर्ष मानवला असता का ? या वास्तवाची जाण आजच्या पिढीला असणे महत्त्वाचे आहे. धार्मिक क्षेत्रातील पुरोहितशाहीच्या वर्चस्वाला सुरूंग लावला. वर्गीय स्वातंत्र्य, समानतेचा पुरस्कार निर्माण केली. त्यामध्ये शाहुराजांच्या क्रांतिकारी निर्णायक लढाईचा भाग मोठा आहे. वेदांचे स्वातंत्र्य आणि समानता एका रात्रीत मिळालेले नाही. वेदोक्ताचा अधिकार सर्वांना आहे. तसेच तो घेण्याचे अथवा नाकारण्याचे स्वातंत्र्यही आज प्रत्येकाला आहे. शाहू महाराजांनी सुराज्याच्या निर्मितीसाठी समाजात स्वातंत्र्य आणि समानता प्रस्थापित केली. १२ ऑक्टोबर १९१९ मध्ये सदाशिव लक्ष्मण पाटील बेनाडीकर यांना क्षत्रिय जगद्‌गुरु म्हणून नेमले. परमेश्वर व मनुष्यातील दलाल नष्ट करण्याचे कामच नव्या क्षात्रजगतगुरुवर सोपविले होते. संन्यासी गुरु जाऊन संसारी गुरु ही प्रथा शाहूराजांनी सुरू केली. धार्मिक क्षेत्रातील ही मोठी क्रांती होती.

समाज विकासाच्या आड येणारी आणि निरपराधांचे माणुसपण हिराऊन त्यांच्यावर अमानुषपण लादणारी जातीयता, स्पृश्य अस्पृश्यता संपविल्याशिवाय समाजाची उन्नती होणार नाही. त्वर्य अस्पृश्य समाज बांधावांचे जीवन सुखकर करणेसाठी जातीयतेचे उच्चाटन केले पाहिजे. समानतेचे तत्त्व रूजविणे काळाची गरज आहे. या विचारांती शाहू महाराजानी इस १९१८ साली आंतरजातीय विवाहाचा कायदा केला. आपल्या घरामध्येच पहिला आंतरजातीय धर्मीय विवाह घडवून आणला होता. ''महाराष्ट्रातील अस्पृश्यांसकट तमाम मागासलेल्या बहुजन समाजाचा उद्धार हे माझे पवित्र जीवनकार्य आहे.''असे अस्पृश्यता निवारण हे कर्तव्य मानणारे राजर्षी शाहू महाराज प्रजाहितदक्ष राजे होते.आज कोणी जातपात मानत नाही. तरुण पिढी आधुनिक जीवन जगते. अशी विधाने सर्रास केली जातात. अस्पृश्यता ही कायद्याने संपुष्टात आली. पण मानवी मनातून व व्यवहारातून संपुष्टात आलेली नाही हे वास्तव आहे. २७ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी मागास जातींना आरक्षण जाहीर केले. गंगाराम कांबळेला कोल्हापुरातील हमरस्त्यावर सत्य सुधारक हॉटेल काढुन दिले. त्यामध्ये महाराज जाणीपूर्वक गंगारामच्या हॉटेलवर थांबून भर रस्त्यात चहा पितात. तसेच घोडा गाडीत बसलेल्या सर्वांना चहा पाजतात. भारताच्या इतिहासातील ही अस्पृश्योध्दारक प्रसिद्ध ऐतिहासिक घटना आहे. शाहूराजांनी आपल्या संस्थानात प्रबोधन कायदा आणि परिवर्तन या त्रिसुत्रीचा अवलंब करून अस्पृश्यता निवारण करण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

उपेक्षित, वंचित, अस्पृश्य, मागास गरीब बहुजन समाजाचा उध्दार हेच अंतिमत: शाहू महाराजांचे स्वप्न होते. या समाजातील प्रत्येकाला माणूस म्हणून मानाने इमानाने जगण्याचा अधिकार बहाल करण्यासाठी शाहू महाराजांनी प्रागतिक क्रांतीदर्शी कार्य केले आहे. असमानता, विषमता, मागासलेपण, अज्ञान, अंधश्रध्दा दूर करावयाची असेल तर महात्मा फुले यांचा आदर्श समोर ठेवून शिक्षणाशिवाय बहुजन समाजाचा उध्दार तसेच त्यांची सर्वांगिण उन्नती होणार नाही. हे दूरदृष्टीच्या शाहू राजांनी ओळखले. समाजातील बहुजन, उपेक्षित वंचित विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणायचे असेल तर त्याला शिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच माणसाला प्रतिष्ठा, न्याय हक्क तसेच त्याच्या नैसर्गिक जीवन, कौशल्यांचा विकास घडवून आणून ज्ञानाने आणि मानाने सजग, सर्जनशील माणूस बनेल. माणुस होऊरन जीवन जगणे त्याला सुसहय व्हावे यासाठी संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे शाहूराजे आहेत. प्रसंगी शाळेत मुलांना न पाठविणाऱ्या पालकांना दंडात्मक कार्यवाही करणारे शाहू महाराज आहेत.बहुजन समाजातील लोक शिकून शहाणे सुसंस्कृत व्हावेत. त्यांचे दैन्य, दारिद्रय मागासलेपण दूर व्हावे आणि त्यांच्या जगण्याला प्रतिष्ठा

प्राप्त व्हावी या उद्देशाने तळमळणारे राजर्षी शाहू महाराज विद्यापीठ हायस्कूलची इमारत उभी करण्यासाठी सहा तास भर उन्हात थांबताना अनेक मंगल स्वप्ने त्यांनी पाहिली होती. आजच्या मोफत शिक्षण कालबाहय होत आहे. आजकाल महागडया शिक्षाणाची दशा आणि दिशा पाहून मन बेचैन करणारे आजचे दाहक वास्तव आहे. शाहू महाराजांच्या कृतीशील विचारांची प्रस्तुतता महत्वाची आहे.

शाहू महाराज समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नयनासाठी कृतीशील होते. उपेक्षित, वंचित, अस्पृश्य, मागास, कृष्ठरोगी यांच्या विकासासाठी ते प्रागतिक विचाराने क्रियाशील होतात. विशाल सुहदयी मनाचे होते. बहुजनांच्या उध्दाराचा कल्याणाचा ध्यास त्यांनी घेतला होता. इस १८७१ साली गुन्हेगार जमाती कायदाने भटक्या जातीना दिवसातून तीन वेळा हजेरी द्यावी लागली.शाहू महाराजांनी गुन्हेगार जातीतील माणूस म्हणजे जन्मजात गुन्हेगार असतो हे शाहू राजांनी नाकारले. प्रेम व विश्वासाने या गुन्हेगार जातीमध्ये विधायक बदल घडवून त्यांना माणूसपण बहाल केले. मुस्लिम समाज देशाचे अविभाज अंग आहे. अशी हिंदू–मुस्लिम ऐक्याची हाक दिली. राजर्षी शाहू महाराजांनी प्रेम, विश्वास, आपुलकी, समानता बंधुभाव या मूल्यांनी भटके, विमुक्त, अस्पृश्य, मुस्लिम, जैन, लिंगायत या साऱ्या समाज बांधवांना एकत्र करायची गोष्ट ही भारतराष्ट्र बांधणीतील महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. बहुसांस्कृतिक भारत बहूधर्मियांचे श्रध्दास्थान व्हावे ही इच्छा होती.

पुरोगामी राजर्षी शाहू महाराज स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कर्ते होते. नागपूर परिषदेमध्ये''अस्पर्श हा शब्द कोणत्याही माणसास लावणे निंद्य आहे. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. ''असे समतेचा पुरस्कार करणारे क्रांतिकारी विचार शाहू महाराजांनी मांडले होते. समाजातील सर्व घटकाला सन्मान प्राप्त करून देणे हे त्यांनी एक प्रजाहितौषी राजा म्हणून आपले कर्तव्य मानले होते. समाजातील अंधश्रध्दा, चालीरिती, प्रथा परंपरा, विषमता, भेदाभेदांवर प्रहार केला. शाहू राजांनी माणसा माणसातील मन, मत भेदाची दरी कमी करून त्यांच्यामध्ये बंधुभाव निर्माण केला.स्त्री पुरुष समानतेचे पुरस्काराने एकमेकांचा आदर,सन्मान करण्यांच्या बंधुभावाचा नवा मंत्र जनतेला घालून दिला आहे.

कल्याणकारी विवेकनिष्ठ राज्याच्या संकल्पनेमध्ये समाज हिताच्या आड येणाऱ्या अनिष्ठ रूढी परंपरा तसेच परंपरागत समाज संकेतांच्या शृंखला तोडण्याचे ऐतिहासिक कार्य शाहू महाराजांनी केले आहे. स्त्रिला सन्मान प्राप्त करून देवून तिच्या जीवनातील दैन्य, दु:ख, कारूण्य दूर करून पुरूषप्रधान सामाजिकतेच्या अत्याचारांतुन तिला मुक्त केले. भेदाभेद अमंगळ आहे हे शाहू महाराजांनी आपला पुरोगामी कृतीतुन दाखवून दिले. संस्थानामध्ये शाहू महाराजांनी स्त्रियांच्या हिताकरिता ऐतिहासिक कायदे करून स्त्रिचा सन्मान केला आहे.स्त्रिला परंपरागत पुरूषी सामाजिकतेच्या गुलामीतुन मुक्ती करून तिला स्वातंत्र्य व समानतेचा हक्क बहाल केले. पुरूषाप्रमाणे तिलाही समाजात सन्मानाने जगण्यास प्रोत्साहित केले. प्रथमत: स्त्रियांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली. स्त्रियांच्या संरक्षणासाठी तसेच उन्नतीसाठी अनेक सामाजिक अर्थाचे कायदे केले. घटस्फोटाचा तसेच विधवा पुनर्विवाहाच्या कायद्यापासून ते अगदी मुरळी जोगतीणीच्या प्रथेला प्रतिबंध करणारे समाज क्रांतीकारी कायदे केले. तसेच आपल्या विधवा सूनेचे पुनर्स्थापन करण्यासाठी झटणारे पालक शाहू महाराज किती मोठया मनाचे होते हे लक्षात येते. आपल्या राजपरिवारातील स्त्रियांना गावकुसाबाहेरील झोपडी तसेच पालांमध्ये जगणाऱ्या मागास समाजासमवेत हळदी कुंकू व चहापान करण्याचे आदेश करतात. सव्वाशेहे वर्षापूर्वीच्या काळात क्रांतीदर्शी असे कार्य केले आहे. अस्पृश्यता, विषमता भेदाभेद संपुष्ठात यावे हा भविष्यवादी समाज कल्याणकारी शाहू महाराजांचा त्यामागे उद्देश होता. स्त्री हा समाजातील सर्वात मोठा शोषित घटक आहे. धार्मिक, सामाजिक राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व लैंगिक पातळीवर स्त्रियांचे होणारे शोषण उद्विग्न करणारे आहे. अशावेळी आपल्या राजसत्तेचा वापर अस्पृश्यता आणि स्त्री जीवन हितकारक करण्यासाठी शाहूराजांनी कायद्याचा कठोर वापर करून अस्पृश्याप्रमाणे स्त्रीयांनाही शाहू महाराजांनी स्वातंत्र्य समानता आणि सन्मान प्राप्त करून दिला.

राजर्षी शाहू महाराजांनी नवमतवादी आचार विचार आणि चरित्र व चारित्र्याचा आदर्श घालून देणारे राजे होते. एक प्रजाहित दक्ष, विनयशील, सुंसस्कृत लोकराजा होते. चारित्र्य संपन्नता हा त्यांच्याकडे अनमोल गुण होता. राजा ही शोभेची गोष्ट नसुन विधायक समाज कार्य करण्याचे व्रत आहे. हे वास्तव जाणणारे शाहू राजे होते. सुख समृध्दीमध्ये स्वत:चे रंजन करणारे विलासी जीवन जगणारे ते राजे नव्हते. जनकल्याणाचा ध्यास घेतलेले राजर्षी होते. ब्राहमण वर्गाची पुरोहितशाहीची मक्तेदारी राजर्षी शाहू महाराजांनी संपुष्ठात आणल्यानंतर खवळलेल्या या वर्गाने जाणीवपूर्वक महाराजांचे चारित्र्य हनन करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यासर्वाना ते पुरून उरले. आपल्या तत्त्व सत्व तसेच सदाचारापासून कधीही दूर गेले नाहीत. त्यांच्याशी लढा दिला तो वैचारिकतेने. नि:शस्त्र लढले आणि जिंकलेही. अत्यंत निर्धाराने परतवून आपले चारित्र्य दाही दिशा नखशिखांत उजळवले. जराही ते डगमगले नाहीत.स्वत:च्या मताशी इमाने इतबारे प्रामाणिक राहत त्यांनी कशाचाही डाग आपल्या व्यक्तिमत्वाला लावून घेतला नाही. शाहू महाराजांचे चरित्र आणि चारित्र्य अस्सल बावनक्कशी सोन होते. लग्न, बायका टीका टिप्पणी केलीत. छत्रपती शिवाजी महाराज,

छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रमाणे राजर्षी शाहू महाराजांची बदनामी या वर्गाने केली. असत्य, कपोकल्पीत गोष्टीना थारा मिळाला नाही. आपण जो आदर्श जपतो तोच आदर्श जनतेला देत असतो. शाहू राजांनी आपल्या कृती उक्तीतुन दाखवुन दिले.

कलावंतांना राजदबारी राजाश्रय देवून त्यांचे कौशल्य, गुण विकसित करणे हा राजर्षी शाहू महाराजांचा विशुध्द हेतू होता. लोकरंजनातुन प्रबोधन आणि प्रबोधानातुन संस्कृती, इतिहासाचे संवर्धन हा त्यांचा उदात्त हेतू होता. कोल्हापूर ही मल्लनगरी म्हणून ओळख शाहू महाराजानी निर्माण केली. कुस्तीच्या माध्यमातुन शरीर, मन आणि मेंदू बळकट आणि तंदुरूस्त करू पाहणारे शाहू महाराज अशा चारित्र्यसंपन्न पैलवानांकरता सोन्याची राशी ओतणारा व ढसाढसा रडणारे शाहूराजे होते. शरीर बळकट परंतु मन दुर्बल अशी ही अवस्था असणाऱ्या आजकालच्या मुजोर पैलवानांच्या बेधकपणे लांगेत हात घालून त्यांना वठणीवर आणणारे आणि शारीरिक ताकद ही विधायक कार्यासाठी वापरावी असे कृतीतून दाखवणारे शाहू महाराज होते. शरीर बळकट होण्यासाठी जसा खुराक आवश्यक तसेच चारित्र्यवान शरीर मन आणि मेंदू घडवण्यासाठी तंदुरूस्त सकारात्मक विचाराची आवश्यकता असते.

छत्रपती शाहूराजे हे विषमता विरोधी राजे होते.याचा अर्थ संपूर्ण ब्राह्मण जात शाहू राजांची वैरी असा होत नाही. अथवा शाहूराजे हे ब्राह्मण विरोधी होते असाही होत नाही.शाहू महाराज अपप्रवृत्तीविरोधी होते. विषमतेचे समर्थन करणाऱ्या सनातनी ब्राह्मणी प्रवृत्तींना वठणीवर आणत होते. आपल्या हौदावरील पाणी बाटले म्हणून गंगाराम कांबळेला बेदम मारहाण करणाऱ्या मराठा बंधूंच्या चामड्या ठेचणारे शाहू राजे होते. ब्राह्मण समाजातील सनातनी वर्ग जसा शाहू विरोधी होता तसेच काही चांगले ब्राह्मण समाजाचे लोक त्यांच्याबरोबर कार्यरत होते. हे देखील सत्य आहे. शाहू महाराजांचा अस्पृश्योध्दाराचा लढा कोणा एका जातीविरोधी नव्हता तर तो प्रवृत्ती विरोधी होता. समाज विकासाच्या आड येणाऱ्या अपप्रवृत्तीला वठणीवर आणण्यासाठी शाहू महाराजांचे पुरोगामी विचार आजही प्रस्तुत आहेत.

समाजातील शेतकरी व कामगार हा सर्वात उपेक्षित आणि वंचित घटक कालही होता आणि आजही तसाच त्यांना कोण वालीच नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कामगार वर्गाची मुस्कटदाबी होणे नवी गोष्ट नाही. अशावेळी शेतकऱ्यांचे नेते शासनाचे पाय चाटत होते.कामगार नेते कामगारांच्या प्रगतीसाठी ठोस पावले उचलत नाहीत. त्यामध्ये शेतकरी व कामगार बंधूंच्या हाल अपेष्टा राजर्षी शाहू महाराजांना पाहवत नाहीत. तेव्हा ''मी तुमचा कर्मबंधू व धर्मबंधू आहे.'' असे आधारवड बनुन त्यांच्या मदतीला धाऊन जातात. शेतकरी कामगारांचे दु:ख,कारूण्य आणि यातायात पाहून शाहू महाराज त्यांना अन्यायाच्या विरोधात क्रांतीचा उठाव करण्याची प्रेरणा देतात. दयाळूवृत्तीच्या शाहू महाराजांना नेहमी उपेक्षित वंचित घटकाबद्दल सहानुभूती वाटत होती. समाजात कृतीशील विद्वान,कलावंत समाज सेवक, विचारवंत असणे ही त्या समाजाची मोठी बौध्दिक संपत्ती असते. त्या समाजाची ती श्रीमंती असते. अशा विद्वानांना वेळोवेळी राजाश्रय देवून त्यांना जपणारे व प्रोत्साहित करणारे शाहूराजे होते. क्षेत्र प्रशासकीय असो की वृत्तपत्रांचे शिक्षणाचे असो की इतर कोणतेही शाहूराजे यामधील विद्वानांना प्रोत्साहित करायचे आणि मग ते विद्वान लोक कल्याणाची काळजी विचार कृतीतून पुढे न्यायचे. कोल्हापूर प्रबोधननगरी झाली ती याच शाहूदृष्टीमुळे समाज सुधारक, क्रांतिकारक तसेच विद्वानांना जपणुकीमुळे. कृतिशील विद्वान नसणारा समाज कधीच प्रगती करीत नसतो. त्यामुळे समाज विकासाकामी विद्वानांना शाहू महाराज प्रोत्साहित करत होते. शिवाजी महाराजांचा खरा इतिहास सामान्यांना कळावा.या हेतूने शाहू महाराजांनी इतिहासकार कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांच्याकडून शिवचरित्र लिहून घेतले. तसेच या शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर करून जगभरातील सर्व ग्रंथालयांना स्वखर्चाने पाठवून दिले. त्याने युगपुरूष शिवाजी महाराजांचा पराक्रम जागतिक पातळीवर स्तरांवर पोहचविला.

ज्याच्या अंगी संस्कार तो सुसंस्कृत विवेकी असतो. अन् विवेकी समाज निर्माण करती असतो. संस्कारक्षम व्यक्ती समाजालाही संस्कारीत करत असते. शाहूराजांनी आपल्या वैचारिक विरोधकांना कधीही आकसाने सुड बुध्दीने वागविले नाही. लोकमान्य टिळक व त्यांच्या पंथीयांचा राजर्षींनी कधीही दु:स्वास केला नाही. उलट लोकामान्यांच्या आजारपणात त्यांना कोल्हापूरला ''हवा पाणी बदलायला या'' असे जाहीर निमंत्रण देऊन 'वैर विचारांचे विचारांशी असते. माणसाचे माणसाशी नाही' हा अत्यंत हितोपदेशी विधायक संदेश दिला. ज्या टिळक पंथीयांनी शाहूराजांना 'स्वराज्यद्रोही' ठरविले. त्याच टिळकांचे अनुयायी असणाऱ्या श्रीधर खेर या क्रांतिकारकाला योग्य ती आर्थिक मदत करून आपण स्वराज्यरक्षक देशभक्त स्वातंत्र्य प्रेमी आहोत याचा दाखलाच शाहूराजांनी घालून दिला. सच्चा क्रांतिकारकांना योग्य ते सहाय्य करण्याची शाहू महाराजांचे विवेकीनिष्ठ कार्य नेहमीच आदर्शवत आहे.

समाजातील वेगवेगळ्या विधायक पुरोगामी प्रवाहांना पाठिंबा देऊन त्यांना समाजात जागृतीसाठी कृतिशील बनवणे हा शाहू महाराजांचा बहुजन हितकारक नवमतवादी गुण होता. राजर्षी शाहू कोणत्या एकाच विचारी प्रवाहात सीमित न होता आपल्या प्रजेची प्रगती करणारे आधुनिक क्रांतिकारक होते. समाज विकासाला आवश्यक विधायक विचारसरणीचा पुरस्कार करून शाहू महाराजांनी वाटचाल केली. पण स्वत:ला कोणत्याही एका विचारसरणीत बंदिस्त करून घेतले नाही. रेल्वेचे रूळ जसे समांतर चालतात. पण एकमेकात मिसळत नाहीत. तसे शाहू महाराज एखाद्या

विचारसरणीचे न होता खरेतर हा स्वत:चा मार्ग नव्याने आखण्याचा अत्यंत रास्त व स्तुत प्रयत्न आहे. चांगले ते घ्यावे कालबाह्य ते टाकुन देत स्वत:च्या विचारांना अधिक गतीशील बनवावे ही राजर्षी शाहू महाराजांची विचारधारा होती. संस्थानामध्ये सर्व समाज घटकांना समान न्याय, हक्क, प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. जातीधर्मातील अमानुष व्यवहाराला पायबंद घातला. समाजातील शोषित उपेक्षित, वंचितांना सामाजिक न्याय व त्यांना प्रोत्साहन देऊन समाज हित साधणारे होते. कला साहित्यकारांना प्रेमपूर्वक जपणारे रसिक होते. तसेच कारागिरांच्या कौशल्याला भरभरून दाद देऊन त्यांना उदार मनाने राजाश्रय देत होते. प्रजाहित दक्ष राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीचे यशस्वी नेतृत्व करण्याचे धारिष्ठ मोठे होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते आधुनिक युगातील एक नवमतवादी विवेकनिष्ठ नवसमाज निर्मिती करणारे पुरुषोत्तम होते.

**निष्कर्ष –**

१. शाहू महाराजांनी सर्व समाज घटकांना समान न्याय, हक्क, प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

२. राजर्षी शाहू महाराजांनी सुसंस्कृत संस्कारी सुसंस्कृत विवेकीपणा हा विकासाचे कारण असतो हे दाखवुन दिले.

३. राजर्षींनी पुरोगामी प्रागतिक विचार कार्याने समाजामध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणले.

४. शाहू महाराजांनी पुरोगामी नवमतवादी सुराज्याचे विवेकी मॉडेल निर्माण केले.

५. अनिष्ठ प्रथा परंपरा, समाज संकेत नाकारून समाज मनात सामाजिक क्रांतीचे बीज पेरले.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. राजर्षी – उमेश सुर्यवंशी, लोकराजा फोरम दळवी कॉलनी बालिंगा,कोल्हापूर

२..राजर्षी शाहू छत्रपती – डॉ.टी.एस.पाटील, श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर सप्टेंबर २०१२

३. लोकराजाशाहू छत्रपती – डॉ.रमेश जाधव, महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पुणे.

४. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ– डॉ.जयसिंगराव पवार महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती पुणे.

५. एकविसाव्या शतकातील सामाजिक प्रश्न– डॉ.सुनीलकुमार लवटे अक्षर दालन कोल्हापूर २०१८

६. पुरोगामी राजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज –प्रा.सतीश मस्के ई सकाळ दि.१२ ऑक्टो.२०२२

७. महाराजा सयाजीराव आणि राजर्षी शाहू –प्रा.दिनेश पाटील महाराष्ट्र टाईम्स दि.२६ जून २०२१